आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१४ जुलै २०२४ - शनिवार

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबईत येणार असून त्यांच्या हस्ते ५२ हजार ३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या विविध प्रकल्पांचं भूमिपूजन आणि लोकार्पण होणार आहे. गोरेगाव इथल्या नेस्को प्रदर्शन केंद्रात रस्ते, रेल्वे आणि बंदर क्षेत्राशी संबंधित २९ हजार ४०० कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी मोदी यांच्या हस्ते होईल. गोरेगाव- मुलुंड रस्त्यावरचा जुळा बोगदा, ठाणे - बोरिवली दरम्यानचा बोगदा तसंच, नवी मुंबईत तुर्भे इथं कल्याण यार्ड रिमॉडेलिंग आणि गती शक्ती मल्टी मॉडेल कार्गो टर्मिनल या प्रकल्पांची पायाभरणी प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्यानंतर प्रधानमंत्री लोकमान्य टिळक टर्मिनसवरच्या नवीन फलाटाचं लोकार्पण करतील. मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेचं उद्घाटन देखील प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार असून संध्याकाळी ते इंडीयन न्यूजपेपर सोसायटीच्या नव्या इमारतीचं उद्घाटन करतील.

<><><><><>

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन काल संपलं. १४ व्या विधानसभेचं हे अखेरचं अधिवेशन होतं. अधिवेशन काळात झालेल्या कामकाजाचा आढावा शेवटच्या दिवशी दोन्ही सभागृहात मांडण्यात आला.

विधानसभेत या अधिवेशन काळात एकूण १३ बैठका झाल्या, त्यात ९१ तास २ मिनिटं कामकाज झाल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सांगितलं. अधिवेशन काळात आठ शासकीय विधेयकं संमत करण्यात आली. विधानसभा सदस्यांची या सत्रातली उपस्थिती ६७ टक्क्यापेक्षा जास्त राहिली.

विधानपरिषदेत उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी कामकाजाचा आढावा सभागृहासमोर मांडला. या अधिवेशन काळात एकूण १३ बैठकांमधे ६० तास २६ मिनिटं कामकाज झालं. विधानपरिषदेत दोन अध्यादेश पटलावर ठेवण्यात आले, तर तीन शासकीय विधेयकं संमत करण्यात आली. कामकाजाच्या काळात सदस्यांची उपस्थिती ७७ टक्के इतकी राहिल्याचं गोऱ्हे यांनी सांगितलं.

<><><><>

नीति आयोगानं काल २०२३-२०२४ साठीचा SDG इंडिया इंडेक्स अर्थात शाश्वत विकास उदिष्ट निर्देशांक जारी केला. नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी आधिकारी बीव्हीआर सुब्रह्मण्यम आणि नीतिआयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा निर्देशांक जारी करण्यात आला. जागतिक पातळीवर प्रतिकूल परिस्थिती असूनही भारत शाश्वत विकास उद्दिष्टांकडे प्रगती करत आहे, २०१८ मध्ये ५७ आणि २०२०-२१ मध्ये ६६ वरून हा निर्देशांक २०२३-२४ मध्ये ७१वर गेला आहे.

<><><><>

प्राप्तिकर विभागानं २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ६ लाख ४५ हजार कोटी रुपयांहून अधिक प्रत्यक्ष कर संकलन केलं आहे तसंच या महिन्याच्या ११ तारखेपर्यंत ७० हजार ९०२ कोटी रुपयांचा परतावा जारी केला आहे. एकूण संकलनात २ लाख ६५ हजार ३३६ कोटी रुपये कॉर्पोरेट कर, ३ लाख ६१ हजार ८६२ कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि १ हजार ४२६ कोटी रुपये इतर करांचा समावेश असल्याचं प्राप्तिकर विभागानं जारी केलेल्या आकडेवारीत म्हटलं आहे.

<><><><>

कांदा कापूस आणि सोयाबीन दरांच्या चढउतारांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लवकरच दिलासा देण्याचं आश्वासन केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल यांना दिलं आहे. पाशा पटेल यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.

<><><><>

महाराष्ट्रातल्या विविध नगरपंचायती, एका नगरपरिषदेतल्या सदस्य पदांच्या ११ रिक्त जागांसाठी, येत्या ११ ऑगस्ट २०२४ रोजी मतदान होणार असल्याचं राज्य निवडणूक आयोगानं जाहीर केलं आहे. कोल्हापूराच्या हातकणंगले

नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या रिक्त जागेची पोटनिवडणुकीही त्याच दिवशी घेतली जाईल असं आयोगानं कळवलं आहे. मतमोजणी १२ ऑगस्ट ला होणार आहे.

या निवडणुकीसाठी उमेदवारांना रविवार २१ जुलै वगळून दिनांक १८ ते २४ जुलै २०२४ या कालावधीत अर्ज दाखल करता येणार आहेत, तर २५ जुलै ला अर्जांची छाननी होणार असल्याचं आयोगाच्या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांकडून रब्बी हंगामात केलेल्या खरेदीची रक्कम अदा करण्यासाठी ६५ कोटी रुपयांचा निधी जिल्हा विपणन महासंघाच्या खात्यात रक्कम वर्ग केला गेला आहे. यानंतर आता येत्या सोमवार पासून धान्याच्या खरेदीचा परतावा संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात हस्तांतरीत केला जाणार आहे.

**<><><><><>**

**मुंबई, पुणे आणि आसपासच्या भागात** आज सकाळपासून पाऊस सुरु असून मुंबईत पावसाने जनजीवन प्रभावित झालं आहे. मुंबईत मध्य आणि हार्बर रेल्वेमार्गावरील काही गाड्या उशीराने धावत आहेत. हवामान विभागानं मुंबई आणि पुणे जिल्ह्यात आज आणि उद्या रेड अलर्ट जारी केला आहे.  पावसामुळे **मुंबई, ठाणे, कल्याण, भिवंडी** सह अनेक ठिकाणच्या सखल भागात पाणी साचलं आहे. अंधेरी, मिलन सबवे आणि मालाड सबवे मध्ये पाणी साचल्यानं हे मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. पुणे विभागात हलका ते मध्यम पाऊस सुरु आहे.

हवामान विभागानं **पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग** जिल्ह्यांना उद्यासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

**//<><><><><>//**